जनसंपर्क कक्ष
'शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर'
2 3 MAY 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात उद्या अक्षर संमेलन

कोल्हापूर : 'माझी शाळा माझा फळा' समूह आणि शिवाजी विद्यापीठाचा संगीत व नाट्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २४ ते २६ मे या कालावधीत महाराष्ट्रातील कलाकारांचे तिसरे राज्यस्तरीय अक्षर संमेलन होणार आहे. उद्‌घाटन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते होईल. महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाचे सहसचिव व्यंकटेश भट संमेलनाध्यक्ष आहेत. अक्षरमित्र संयोजक अमित भोरकडे, स्वागताध्यक्ष सतीश उपळावीकर, डॉ. ठाकूरदेसाई होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 MAY 2024
लोकमत

# विद्यापीठात उद्यापासून राज्यस्तरीय अक्षर संमेलन

## देशभरातील ३०० कलाकार होणार सहभागी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : 'माझी शाळा, माझा फळा' समूह आणि शिवाजी विद्यापीठाचा संगीत व नाट्यशास्त्र विभाग यांच्या वतीने येत्या २४ ते २६ मे या कालावधीत महाराष्ट्रातील कलाकारांचे तिसरे राज्यस्तरीय अक्षर संमेलन आयोजित केले आहे. राज्य शासनाच्या गृह विभागाचे सहसचिव व्यंकटेश भट हे संमेलनाध्यक्ष आहेत. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागामध्ये होणाऱ्या संमेलनात महाराष्ट्रासह अन्य राज्यांतीलही कलाकार, कलाप्रेमी शिक्षक सहभागी होणार असल्याचे संयोजक अमित भोरकडे, स्वागताध्यक्ष सतीश उपळावीकर आणि संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी सांगितले.

उद्या शुक्रवारी (दि. २४) सकाळी ११ वाजता कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होईल. दुपारी ३ वाजता कलेतून व्यवसायनिर्मिती या विषयावर परिसंवाद होईल. शनिवारी (दि. २५) सकाळी ९ वाजता फलक लेखन व व्यक्तिचित्र रेखाटन प्रात्यक्षिक होईल. सकाळी १० वा. डिजिटल कॅलिग्राफी सादरीकरण होईल. दुपारी ४.३० वाजता लेखन साहित्य खरेदी-विक्री, सायं. ५.३० वाजता इंटरनॅशनल पेन प्रदर्शन, रात्री ९.०० वाजता सांस्कृतिक कार्यक्रम सादर होईल. रविवारी (दि. २६) सकाळी ७ वाजता विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर हॅप्पी आर्ट मॉर्निंगमध्ये वैयक्तिक कलेचे सादरीकरण होईल. सकाळी ९.०० वा. भागवत सपकाळे (मुंबई), बबन माने, विजय टिपुगडे, अभिजित कांबळे, विजय उपाध्ये (सर्व कोल्हापूर) यांचे निसर्गचित्र प्रात्यक्षिक होईल. दु. ३ वाजता अक्षर सन्मान सोहळ्याने संमेलनाची सांगता होईल. कुलगुरू प्रा. डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान होणार आहे. यावेळी सहसचिव कैलास बिलोणीकर, महसूलचे सहसचिव संजय इंगळे, जिल्हाधिकारी अमोल येडगे व विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार उपस्थित राहणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 MAY 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून तिसरे राज्यस्तरीय अक्षर संमेलन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

'माझी शाळा माझा फळा' समूह आणि शिवाजी विद्यापीठाचा संगीत व नाट्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २४ ते २६ मे या कालावधीत महाराष्ट्रातील कलाकारांचे तिसरे राज्यस्तरीय अक्षर संमेलन आयोजित केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाचे सहसचिव व्यंकटेश भट संमेलनाध्यक्ष आहेत.

शुक्रवारी सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन होईल. यावेळी ज्येष्ठ चित्रकार संजय शेलार, शुभम गायकवाड, नरेंद्र महाडिक व ज्येष्ठ अक्षरमित्र सहभागी होतील. यानंतर 'कलेतून व्यवसायनिर्मिती' या विषयावर परिसंवाद होईल. गालिचा व अक्षर रांगोळी उपक्रम होईल. रात्री संगीत मैफल होईल. यामध्ये 'मी होणार सुपरस्टार जल्लोष ज्युनिअर्सचा फेम' कु. श्रीमयी सूर्यवंशी सादरीकरण करतील.

शनिवारी फलक लेखन व व्यक्तिचित्र रेखाटन प्रात्यक्षिक होईल. रात्री ९ वाजता संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे सांस्कृतिक कार्यक्रम होईल. रविवारी (दि. २६) विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर हॅप्पी आर्ट मॉर्निंगमध्ये वैयक्तिक कलेचे सादरीकरण होईल. अक्षर सन्मान सोहळ्याने संमेलनाची सांगता होईल.

यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान होणार आहे. यावेळी गृह विभागाचे सहसचिव व्यंकटेश भट, सहसचिव (मुख्यमंत्री कार्यालय) कैलास बिलोणीकर, सहसचिव (महसूल व वन विभाग) संजय इंगळे, जिल्हाधिकारी अमोल येडगे व विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार उपस्थित राहणार आहेत. रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अक्षरमित्र संयोजक अमित भोरकडे, सतीश उपळावीकर व संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
"शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर"
23 MAY 2024
सकाळ

# विद्यापीठात उद्यापासून तिसरे राज्यस्तरीय अक्षर संमेलन

कोल्हापूर, ता. २२ : 'माझी शाळा, माझा फळा' समूह आणि शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे शुक्रवार (ता. २४) ते रविवार (ता. २६) दरम्यान महाराष्ट्रातील कलाकारांचे तिसरे राज्यस्तरीय अक्षर संमेलन होणार आहे. राज्य शासनाच्या गृह विभागाचे सहसचिव व्यंकटेश भट हे संमेलनाध्यक्ष आहेत.

या संमेलनाचे उद्घाटन शुक्रवारी सकाळी अकरा वाजता कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते होईल. दुपारी तीन वाजता 'कलेतून व्यवसायनिर्मिती' या विषयावर परिसंवाद होईल. सायंकाळी पाच वाजता गालीचा व अक्षर रांगोळी उपक्रम होईल. त्यात गणेश माने, तेजस लोखंडे, प्रतीक पानसरे, अमित भोरकडे, गणेश तुपे सहभागी होतील.

शनिवारी सकाळी नऊ वाजता फलक लेखन, व्यक्तिचित्र रेखाटन प्रात्यक्षिक होईल. यात महेश निर्मले, अतुल गायकवाड, सुनील सूर्यवंशी, वसंत अकोलकर सहभागी होतील. सकाळी दहा वाजता डिजिटल कॅलिग्राफी सादरीकरणात सचिन गडाख, अमित भोरकडे, तर पेन्सिल व ब्रश कॅलिग्राफीत अनिल गोवळकर सहभागी होतील. सकाळी अकरा वाजता 'माझी कला आणि मी' या विषयावर हेमंत घरत, राजेंद्र हंकारे, सचिन सावंत, श्रीकांत गवांडे, ऋषिकेश उपळावीकर, अशांत मोरे सादरीकरण करतील. दुपारी साडेतीन वाजता छत्रीवरील सुलेखनाची प्रात्यक्षिके सतीश उपळावीकर, मोहन कांबळे, दीपक गोंधळे, महेंद्र शिरोडकर सादर करतील. रविवारी सकाळी सात वाजता विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर हॅप्पी आर्ट मॉर्निंगमध्ये वैयक्तिक कलेचे सादरीकरण होईल. सकाळी नऊ वाजता भागवत सपकाळे, बबन माने, विजय टिपुगडे, अभिजित कांबळे, विजय उपाध्ये यांचे निसर्गचित्र प्रात्यक्षिक होईल. दुपारी तीन वाजता संमेलनाची सांगता होईल, असे अक्षरमित्र संयोजक अमित भोरकडे, स्वागताध्यक्ष सतीश उपळावीकर आणि संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 MAY 2024
सकाळ

# विद्यापीठात सोमवारपासून 'रोबोटिक्स प्रशिक्षण'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ, आरएनटी रोबोटिक्स आणि एसयुके रिसर्च अँन्ड डेव्हलपमेंट फाउंडेशन यांच्यातर्फे सोमवार (ता. २७) ते शनिवार (ता. १ जून) दरम्यान सकाळी अकरा ते दुपारी दोन यावेळेत रोबोटिक्स प्रशिक्षण शिबिर होणार आहे. बारा वर्षांवरील शालेय विद्यार्थ्यांना त्यात सहभागी होता येईल. स्पर्धेत टिकून राहावयाचे असल्यास रोबोटिक्ससारख्या विषयाची माहिती असणे आवश्यक झाले आहे. बेसिक इलेक्ट्रॉनिक्स, रोबोटिक्स, थ्रीडी डिझाईनिंग अॅन्ड प्रिटिंग आदी विषयावर आरएनटी रोबोटिक्सच्या तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. भविष्यात करिअरच्या दृष्टीने 'एसटीईएम' (सायन्स, टेक्नॉलॉजी, इंजिनिअरिंग अँड मॅथेमेटिक्स) याचा वापर कसा करता येईल, याबाबतचे मार्गदर्शन मिळणार असल्याची माहिती डॉ. एस. डी. डेळेकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 3 MAY 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे ५३९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा व्यवस्थित सुरू झाल्या आहेत. आतापर्यंत ५३९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.

जनसंपर्क कक्ष
23 MAY 2024 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : राधिका कळंत्रेचा सत्कार करताना कुलगुरु डॉ. शिर्के व मान्यवर

# अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत राधिका कळंत्रेचे यश

वार्ताहर
माले

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्राविण्य मिळवल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते राधिका कळंत्रे हिचा सत्कार करण्यात आला.. राधिका हिने पंजाब येथे ऑल इंडिया युनिव्हर्सिटी सॉफ्टबॉल स्पर्धेत रौप्य पदक पटकाविल्याबद्दलही गुणगौरव करण्यात आला.

राधिका यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय वारणानगर येथे एम.एसस्सी तसेच राज्यसेवा परीक्षेची तयारी करत आहे. ज्योतिर्लिंग पब्लिक स्कूल व विद्यानिकेतनचे संस्थापक अध्यक्ष शिवलिंग कळंत्रे याची ती कन्या असून तिने आतापर्यंत राज्य व राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्ण तसेच रौप्य पदके पटकाविले आहेत.

यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, डॉ. पी. एस. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. एस. व्ही बनसोडे उपस्थित होते.